# ई - पोलीस पत्रिका

**दि.११/०५/२०२३** **अनु.क्र.८०**

## (अमरावती शहर पोलीसांची२०२३ ची उद्दिष्टे)

- नागरिकांशीमित्रत्वाचे संबध.
- उच्च मनोबलयुक्त व तणावमुक्त पोलीसदल.
- महिला, मुले व ज्येष्ठ नागरिकांची सुरक्षा.
- जातीय सलोखा वाढविणे.
- संघटित गुन्हेगारी आणि आतंकवादी यांचेविरूद्धकठोरकारवाई.
- रस्त्यावरील गुन्हेगारीवर नियंत्रण/सुरक्षा.
- पोलीसकोठडीत गुन्हे घडू नदेणे.
- आरोपी पोलीसांचेताब्यातून पळून जाऊ नयेत.
- "सुरक्षित व सुखकर अमरावती" हा आमचा संकल्प आम्ही व्यापक लोकसहभागातून साध्यकरू.

## भाग-१

## नेमणुक/पदोन्नती/बदली/प्रशिक्षण/रजा

## बदली

**१.पोआअ/पशा-३/स्वीय सह.दवणे-पदो-हजर/४३९९/२०२३ अमरावती शहर दिनांक ०९/०५/२०२३**

**आदेश**

मा. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई. यांचेकडील आदेश क्रमांक: पोमसं/ ८अ/ उश्रेलले ते स्वीय सहायक/जिल्हा/निवडसुची/२०२२-२३/१५७/२०२२ दि.२५.०४.२०२३ अन्वये पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य मुंबई. यांच्या जिल्हा लिपीक संवर्गातील खालील नमुद उच्च श्रेणी लघुलेखक यांना स्वीय सहायक (राजपत्रित गट-ब) या पदावर कार्यभार स्विकारल्याच्या दिनांकापासून निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देण्यात आली असुन पदोन्नतीवर त्यांची पदस्थापना त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या कार्यालयामध्ये करण्यांत आली आहे.

पोलीस अधीक्षक , रायगड -अलिबाग यांचे कडील आदेश क्रमांक ३१७/पशा-४/ पदोन्नती-कार्यमुक्त/दवणे/२०२३ दिनांक २७/०४/२०२३ अन्वये पोलीस अधीक्षक रायगड ते पोलीस आयुक्त, अमरावती शहर अशी बदली झाल्याने त्यांना पदोन्नतीच्या पदावर हजर होणे कामी दिनांक ०२/०५/२०२३ (मं.नं.) कार्यमुक्त करण्यात आले आहे.

| अ.क्र. | स्वीय सहायकांचे नाव | पुर्वीचे नेमणुकीचे कार्यालय | पदोन्नतीवरील नविन नेमणुकीचे कार्यालय |
|---|---|---|---|
| ०१ | श्री सुरेश अर्जुन दवणे, स्वीय सहायक | पोलीस अधीक्षक, रायगड-अलिबाग | पोलीस आयुक्त कार्यालय, अमरावती शहर |

त्यानुषंगाने श्री सुरेश अर्जुन दवणे हे पोलीस आयुक्त, अमरावती शहर या आस्थापनेवर दिनांक ०४/०५/२०२३ रोजी म.पुर्व स्वीय सहायक पदी पदोन्नतीवर हजर होण्याकरीता आले असुन त्यांना या कार्यालयाचे आस्थापनेवर दिनांक ०४/०५/२०२३ चे म.पुर्व स्वीय सहायक पदी पदोन्नतीवर हजर करुन घेण्यात येत आहे.

**२.पोआअ/पशा-३/कश्रेलि कार्यासन नेमणुक/४३९८/२०२३ अमरावती शहर दिनांक ०९/०५/२०२३**

**आदेश**

श्रीमती निशिगंधा प्रेमानंद देवतळे, कनिष्ठ श्रेणी लिपीक त्यांना प्रसुती रजेस जोडुन कार्यालयाचे आदेश दि.२४/०१/२०२३ अन्वये दि.०४/०३/२०२३ ते ०२/०५/२०२३ पर्यत ६० दिवस बालसंगोपन रजा

मंजुर करण्यात आली होती. श्रीमती निशिंगधा प्रेमानंद देवतळे ह्या बालसंगोपन रजा उपभोगुन दि.०३/०५/२०२३ रोजी कर्तव्यावर हजर होण्याकरीता आल्या असता त्यांना दि.०३/०५/२०२३ रोजी हजर करुन घेण्यात येत आहे. तसेच त्यांची प्रशासकीय कारणास्तव खालील दर्शविलेल्या कार्यासनावर नेमणुक करण्यात येत आहे.

| अ.क्र. | कनिष्ठ श्रेणी लिपीकांचे नाव | सध्याचे नियुक्तीचे कार्यासन | नवीन नियुक्तीचे कार्यासन |
|---|---|---|---|
| १. | श्रीमती निशिगंधा प्रेमानंद देवतळे | परवाना शाखा | बांधकाम लिपीक, पत्रव्यवहार शाखा |
| २. | श्रीमती नितु गणेशराव आवारे | बांधकाम लिपीक, पत्रव्यवहार शाखा | परवाना शाखा |

## <u>प्रशिक्षण</u>

**१.पोआअ/पशा-१/प्रशिक्षण/MPA/TIPWS/४००७/२०२३ अमरावती शहर दिनांक २७/०४/२०२३**

**संदर्भ :-** संचालक, महाराष्ट्र पोलीस अकॅडमी, नाशिक यांचे पत्र क्रं. मपोअ/प्रशि-५/सेवाअंतर्गत प्रशिक्षण/२०२३/२५५९ दि. २१.०४.२०२३

**विषय :-** Training of Investigators and Prosecutors on Women's Safety या विषयावर आयोजित प्रशिक्षणा बाबत.

## <u>आदेश</u>

उपरोक्त संदर्भांकीत विषयान्वये कळविण्यात येते की, **महाराष्ट्र पोलीस अकॅडमी, नाशिक** येथे दि. ०८.०५.२०२३ ते १२.०५.२०२३ पर्यंत आयोजित सेवाअंतर्गत प्रशिक्षणाकरीता अमरावती शहर पोलीस घटकातुन खालिल नमुद पोलीस अधिकारी यांची त्यांचे नावासमोर दिलेल्या प्रशिक्षणाकरीता निवड करण्यात येत आहे.

| Sr. no. | NAME OF COURSE | PLACE AND PERIOD | NAME OF OFFICER | RANK | MOBILE NO | E-MAIL ID | SEVAARTH NO |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | Training of Investigators and Prosecutors on Women's Safety | MAHARASHTRA POLICE ACADEMY NASHIK ०८.०५.२०२३ to १२.०५.२०२३ | AKASH MAHALLE | PSI | ९०६७६३९४३५ | akkiemahalle@gmail.com | DGPABMM८९०१ |

<u>**प्रशिक्षण केंद्रात जाण्यापुर्वी त्या बाबतचे नियम व अटी खालील प्रमाणे :-**</u>

१. पोलीस अधिकारी यांनी प्रशिक्षण सुरु होण्यापुर्वी एक दिवस अगोदर १७.०० वाजे पर्यंत महाराष्ट्र पोलीस अकॅडमी, नाशिक येथे हजर रहावे.

२. सदर प्रशिक्षण हे BPR&D, नवी दिल्ली पुरस्कृत असुन यासाठी येणारा सर्व खर्च त्यांचेकडुन भागविण्यात येणार असल्याने प्रशिक्षणार्थीना कुठल्याही प्रकारचे प्रशिक्षण शुल्क अदा करावे लागणार नाही.

३. प्रशिक्षणाकरीता फक्त प्रशिक्षणार्थीनी उपस्थित राहावे. सोबत पती/पत्नी किंवा लहान मुलांना घेवुन जावु नये.

## भाग-२

## शिक्षा/निलंबन/पुन्हा स्थापना/बक्षिस/सेवानिवृत्त/मयत/नाव कमीकरणे

## निलंबन

**१.पोआअ/विचौ/निलंबन/पोना-९२२ अजय सरोदे/४३८७/२०२३ अमरावती शहर दिनांक ०९/०५/२०२३**

**संदर्भ :-** वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन सिटी कोतवाली, अमरावती शहर यांचे स्पेशल रिपोर्ट दिनांक ०८/०५/२०२३

## निलंबन आदेश

१. ज्या अर्थीतुम्ही चालक पोलीस हवालदार/९२२,अजय उदेभान सरोदे, नेमणुक मोटर परिवहन विभाग, अमरावती शहर येथे नेमणुकीस आहेत. आपणाविरुध्द दिनांक ०८/०५/२०२३ रोजी पो.स्टे.सिटी कोतवाली, अमरावती शहर येथे अप क्रं. २०३/२३ कलम ३७६(२)(न), ३५४(ड), ५०६ भादवि सह कलम ६६ (इ) गुन्हा दाखल आहे.

२. त्या अर्थी चालक पोलीस हवालदार/९२२, अजय उदेभान सरोदे, नेमणुक मोटर परिवहन विभाग, अमरावती शहर यांचेविरुध्द फौजदारी गुन्हयाबाबतचे प्रकरण अन्वेषनाधीन आहे.

३. त्याअर्थी आता मुंबई पोलीस कायदा १९५१ मधील कलम २५ मधील १ (ख) आणि मुंबई पोलीस (शिक्षा व अपिल) नियम १९५६ मधील नियम ३ (१) (अ-२) च्या तरतुदीनुसार, तसेच विभागीय चौकशी नियम पुस्तीका १९९१ मधील प्रकरण दोन मधील नियम २.२ (अ) च्या तरतुदीनुसार गुन्हा दाखल झाल्याचे व अटक झाल्याचे तारखेपासुन म्हणजेच दिनांक ०८/०५/२०२३ पासुन शासन सेवेतुन निलंबित करण्यात येत आहे.

४. त्यानुसार असेही आदेश देण्यात येत आहे की, महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी,स्वियेत्तर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतुन काढुन टाकने यांच्या काळातील प्रदाने) नियम १९८१ चे नियम ६८(एक)(अ) नुसार निर्वाह भत्ता व त्यावरील अनुज्ञेय महागाई भत्ता देण्यात येईल.

५. आणखी असेही आदेश देण्यात येत आहेत की, जोपर्यंत निलंबनाचे आदेश अस्तित्वात असतील तोपर्यंत चालक पोलीस हवालदार/९२२, अजय उदेभान सरोदे, यांचे मुख्यालय पोलीस मुख्यालय,अमरावती शहर हे राहील. निलंबन काळात त्यांना सकाळी व सायंकाळी आपल्या मुख्यालयात हजेरी देणे अनिवार्य राहील. तसेच त्यांना पोलीस आयुक्त, अमरावती शहर यांच्या पुर्व परवानगी शिवाय मुख्यालय सोडता येणार नाही. पोलीस आयुक्त,अमरावती शहर यांच्या पुर्व परवानगी शिवाय त्यांनी मुख्यालय सोडल्यास ती त्यांची गैरवर्तणुक ठरेल व त्या कारणासाठी वेगळया शिस्तभंगाच्या कारवाईस ते पात्र ठरतील.

६. सदर निलंबनाचा आदेश अस्तित्वात असे पर्यंत आपणास कोणत्याही प्रकारचा खाजगी उद्योग अथवा नोकरी करता येणार नाही. जर या कालावधीत कोणतीही खाजगी नोकरी अथवा उद्योग केल्याचे आढळुन आल्यास आपणाविरुध्द शिस्तभंगविषयक कार्यवाही करण्यात येईल.

## भाग-३

## वेतन/वेतन संरचना/वेतन निश्चितीती/वार्षीक वेतनवाढ/संकीर्ण

## वार्षीक वेतनवाढ

**१.पोआअ/पशा-१/वेतनवाढ/पोउपनि-सरनाईक/४४९७/२०२३ अमरावती शहर दिनांक ११/०५/२०२३**

## आदेश

**श्री. विश्वजीत वसंतराव सरनाईक** पोलीस उपनिरीक्षक, पो.स्टे. वलगाव, अमरावती शहर, यांना दिनांक ०१.०७.२०२२ पासून खालीलप्रमाणे देय वार्षिक वेतनवाढ मंजूर करण्यात येत आहे.

| पदनाम | वेतन स्तर | वेतन मॅट्रीक्स | देय वेतनवाढ |
|---|---|---|---|
| पोलीस उपनिरीक्षक | S-१४ | ३८६००-१,२२,८०० | रू. १४००/- |

| मागील वार्षिक वेतन | | | | देय वार्षिक वेतन | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| विवरण | वेतनवाढ दिनांक | वेतनस्तर | वेतन | विवरण | देय वेतनवाढ दिनांक | वेतनस्तर | वेतन |
| पोलीस उपनिरीक्षक | ०१/०७/२०२१ | S-१४ | ४६१०० | पोलीस उप निरीक्षक | ०१/०७/२०२२ | S-१४ | ४७५०० |

प्रमाणित करण्यात येते की श्री विश्वजीत वसंतराव सरनाईक यांना दि. ०१/०७/२०२२ ची वार्षिक वेतनवाढ यापूर्वी मंजूर व प्रदान करण्यात आली नाही. तरी त्यांना वरील वार्षिक वेतनवाढीमुळे देय फरकाची रक्कम रोखीने अदा करावी.

**(किशोर शेंडे)**
प्रशासकीय अधिकारी
पोलीस आयुक्त, अमरावती शहरकरीता

प्रति,
पत्रव्यहार शाखा/सेवापट नोंदणी लिपीक/सीसीटीएनएस